# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी खुर्द,
# तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे - ४१२ ४०५

दूरध्वनी ०२१३३-२३०५८२
Website – www.gcoeara.ac.in, e mail – gcoeara@gmail.com


जा. क्र. शाअसंमअ / आस्था / २०१६ / दि.

प्रति

______________________________

______________________________

______________________________

विषय - अभ्यागत अधिव्याख्याता म्हणून तासिका तत्वावर नेमणूक करणेबाबत
संदर्भ - आपला दि. ______________ रोजीचा अर्ज

उपरोक्त विषयास अनुसरून आपल्याला कळविण्यात येते की या महाविद्यालयातील __________ विभागात शैक्षणिक वर्ष ____________ मधील ___________ सत्रातील _____________________ या विषयासाठी आपली नेमणूक निव्वळ तासिका तत्वावर खालील अटी व शर्तीवर दि. _______________ पासून करण्यात येत आहे.

१) आपल्याला दिलेले सदरचे काम केवळ तात्पुरत्या स्वरूपाचे आहे. त्यामुळे आपणास नियमितरित्या नियुक्त शिक्षकास मिळणाऱ्या सोयीसुविधा अगर इतर लाभ देय नाहीत.

२) हे काम स्वीकारल्यानंतर आपल्याला विनापरवानगी गैरहजर राहता येणार नाही. तसे झाल्यास आपली नेमणूक संपुष्टात आली असे समजण्यात येईल.

३) सदरच्या सत्राचा कालावधी संपल्यानंतर आपली नेमणूक आपोआप संपुष्टात येईल, त्यासाठी वेगळे आदेश दिले जाणार नाहीत. तसेच आपल्याला पुन्हा काम देण्याचे बंधन महाविद्यालयावर राहणार नाही.

४) आपल्याला विभागप्रमुखांच्या सूचनेनुसार काम करावे लागेल. आपल्याकडून कोणतीही गैरवर्तणूक घडल्यास अथवा कोणत्याही अटी व शर्तींचा भंग झाल्यास अथवा विभागप्रमुखांच्या सूचनांचा भंग झाल्यास आपली नेमणूक तत्काळ संपुष्टात आणण्यात येईल.

५) आपल्याला महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. टीईडी-२००८ / (१८३) / ८ / तांशि-५, दि. ०५-११-२००८ नुसार प्रति सैद्धांतिक तासिका रु. ३००/- व प्रति प्रात्यक्षिक तासिका रु. १५०/- प्रमाणे मानधन अनुज्ञेय राहील.

६) विभागातील अभ्यागत तासिका नोंदवहीत आपण प्रत्यक्षात घेतलेल्या तासिकांची नोंद करणे, त्या तासिकादरम्यान आपण नेमके काय अध्यापन कार्य केले याची नोंद करणे, महाविद्यालयाने निर्धारित करून दिलेल्या नमुन्यात विद्यार्थ्यांचे हजेरी पट नोंदविणे आवश्यक राहील. तसेच आपण शिकवीत असलेल्या सैद्धांतिक विषयासाठी Course File व प्रात्यक्षिक विषयासाठी Laboratory Manual तयार करून विभागात सादर करणे आवश्यक राहील, त्याशिवाय आपले मानधन अदा केले जाणार नाही.

७) सत्र समाप्तीनंतर आपण महाविद्यालयाच्या ग्रंथालयातून घेतलेली सर्व पुस्तके परत करून ग्रंथालयाचे न देय प्रमाणपत्र सादर करावे लागेल, त्याशिवाय आपले मानधन अदा केले जाणार नाही.

८) आपल्याला वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्यास तसे स्वीकृती पत्र तत्काळ विभाग प्रमुखांकडे सादर करावे, सीकृती पत्र सादर केल्यानंतरच आपली नेमणूक ग्राह्य ठरेल.

(प्रा. श्री. वि. जोशी)
प्र. प्राचार्य,
शा.अ.सं.म., अवसरी खुर्द